# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)

दि. २७/०४/२०१७.

**प्रेस नोट**

## चोरीच्या गुन्हयातील आरोपी सिडको पोलिसांकडून जेरबंद.

दि.२७/०४/२०१८- आज रोजी पोलीस स्टेशन सिडकोचे सपोनि.झुंजारे हे त्यांच्या पथकासह पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना त्यांना माहिती मिळाली कि, काही इसम एन १२, सिद्धार्थनगर येथील चौकात भांडण करीत आहेत अशी बातमी मिळाल्यावरून त्या ठिकाणी जाऊन पाहिले असता काही इसम आपसात भांडण करत असल्याचे दिसून आले. सदर ठिकाणाहून काही इसम पळून गेले. मारहाण करणारा इसम व ज्याला मारहाण झाली त्यास स्टाफच्या मदतीने ताब्यात घेतले. मारहाण झालेल्या इसमाची तक्रार नोंदवून मारहाण करणाऱ्या इसमाची चौकशी केली असता त्याने त्याचे नाव शेख अमीर उर्फ अम्मू रा.फातीमानगर, हर्सूल असे सांगितले. त्याची अधिक चौकशी केली असता त्याने रहेमानीया कॉलनी येथून पांढ-या रंगाची तवेरा गाडी चोरी केल्याने त्याचे विरुद्ध पोलीस स्टेशन जिन्सी येथे गु.र.नं.६८/२०१८ कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून त्यामध्ये तो फरार असल्याचे समजले. यावरून सदर आरोपीस गुन्हयाच्या पुढील तपासकामी जिन्सी पोलिसांच्या ताब्यात दिले.

हि कार्यवाही पोलीस निरीक्षक श्री.कैलास प्रजापती यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि.झुंजारे,पोना/मोदिराज, जाधव, पोको/दीक्षित, इरफान, सुरे, म्हस्के यांनी केली.

स्वाक्षरीत/-<br>
(रामेश्वर थोरात)<br>
सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे)<br>
औरंगाबाद शहर